महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# पुलंचं 'गाठोडं' उलगडलं...

SMS NEWS to 58888 for latest updates

म. टा. प्रतिनिधी मुंबई

संगीतकार-गायक-कवी-विनोदाचार्य-साहित्यिक-नाटककार पुल... महाराष्ट्राच्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू रसिकांसमोर शनिवारी उलगडले जात होते. निमित्त होते ते पुलंच्या अप्रकाशित साहित्याचे संकलन असलेल्या 'गाठोडं' या पुस्तकाच्या प्रकाशनाचे. या साहित्यिक मैफलीला जोड होती ती राहुल देशपांडे यांच्या रम्य सुरांची आणि सनदी अधिकारी तसेच राजकारणी यांच्यात रंगलेल्या कलगीतुऱ्याची.

पार्ल्याच्या दीनानाथ नाट्यगृहात शनिवारी केंदीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते 'गाठोडं' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी अभिनेता अतुल परचुरे याने गाठोड्यातून या पुस्तकाच्या प्रती आणल्या. हृदयेश आर्ट्स आणि परचुरे प्रकाशन मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात बुकगंगा डॉट कॉमतफेर 'गाठोडं'च्या ई-बुकचेही प्रकाशन करण्यात आले. विजया मेहता, अरुण गुजराथी, अरविंद इनामदार आणि श्रद्धानंद ठाकूर यावेळी वक्ते म्हणून उपस्थित होते.

माजी पोलिस महासंचालक अरविंद इनामदार यांनी, राजकारणी माणसे कशी असतात हे सांगताना छत्तीस वर्षांच्या सेवेत २९ बदल्या झाल्याचे सांगितले. मदासच्या विमानतळावर भेटलेल्या पुलंना चहा पाजल्यावर ते 'चहावाले इनामदार' म्हणून कसे ओळखू लागले याचा विनोदी किस्सा त्यांनी यावेळी सांगितला. विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुण गुजराथी यांनी आपल्या भाषणात इनामदारांच्या शाब्दिक बुलेट परतवून लावताना, 'सगळेच राजकारणी वाईट नसतात, काही अभ्यासू असतात', असे सांगितले. श्रद्धानंद ठाकूर यांनी 'वाऱ्यावरची वरात 'या नाटकात काम करणाऱ्या अठरा कलाकारांवर पुलंनी चारोळ्या लिहिल्या होत्या, असे सांगून त्यातील संजीवनी मराठेंवर केलेली कविता सादर केली. वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या खुशखुशीत निवेदनातून कार्यक्रम रंगत गेला. विजया मेहता यांनी, 'पुलंबरोबरच्या तालमी म्हणजे संगीताची जत्राच असायची', असे सांगून पुस्तकातील काही ओळी पुलंच्या स्टाइलमध्ये वाचून दाखविल्या. पुलंच्या विनोदाला कारुण्याची झालर असायची, असे सांगून सुशीलकुमार शिंदे यांनी पुलचं अप्रकाशित साहित्य लोकांसमोर आणण्याचे काम केल्याबद्दल प्रकाशकांची पाठ थोपटली. तर 'बगळ्यांची माळ फुले', 'घेई छंद', 'सुरत पिया की' ही नाट्यगीतं सादर करून राहुल देशपांडे यांनी शब्द-सुरांची मैफल एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवली.